# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** नागपूर महानगरपालिकेचेनव्याने निर्माण केलेल्या प्रभाग क्र. 68, कर्वे
**{क्रीडा व सांस्कृ. विभाग}** नगर येथील "बॅडमिंटन हॉल" (क्रीडा संकुल) खाजगीसंस्थेला संचालन व देखभालीकरीता 5 वर्ष कालावधीसाठी देण्याकरीता EOI मागविण्याचा प्रश्न खालील अटी-शर्तीसह विचारात घेणे.

1. निविदाधारकाने कमीत कमी एक प्रकल्प प्ले ग्राऊंड स्पोर्टस् कॉम्प्लेक्स, स्विमिंग पुल कॉम्प्लेक्स व तत्सम कामे सरकारी / निमसरकारी / स्थानिक संस्था /खाजगी महाविद्यालय मध्ये 3 वर्षे कार्य केल्याचे अनुभव कागदपत्र सादर करावे.
2. व्यक्ती / संस्थेने मागील 3 वर्षांचा आयकर परतावा भरल्याचा पुरावा सादर करावा. तसेच मागील 3 वर्षाची कमीत कमी उलाढाल 20 लक्ष असल्याचा मागील 5 वर्षांचा सनदी लेखापाल (C.A.) कडून प्रमाणित केलेला पुरावा सादर करावा.
3. 50 हजार रु. बयाना (EMD) रक्कमेचा भरणा ऑनलाईन पद्धतीने करण्यात यावा.
4. व्यक्ती / संस्था जर बयाना (EMD) रक्कम व संबंधी कागदपत्रे भरण्यास अपयशी ठरल्यास त्यांचा तांत्रिक लिफाफा उघडण्यात येणार नाही.
5. निविदा मान्य झालेल्या व्यक्ती / संस्थेला करारनामा करतांना 3 लक्ष रुपयांची डी. डी. सुरक्षा ठेव म्हणून सादर करणे आवश्यक आहे. तसेच म.न.पा. उपायुक्त (मालमत्ता) यांचे नांवे भरणा करण्यात येणा-या रक्कमेच्या 50% रक्कमेची राष्ट्रीयकृत बँकेची बँक गॅरन्टी करणे आवश्यक राहील.
6. व्यक्ती /संस्थेकडे कमीत कमी 2 प्रशिक्षक चालु वर्ष 2022 चे परवाना धारक (AIBF – All India Badminton Federation Or Maharashtra Badminton Association) प्रशिक्षक असणे आवश्यक आहे.
7. निविदा मान्य झालेली व्यक्ती / संस्था जर सुरक्षा ठेव रक्कम व बँक गॅरन्टी सादर करण्यात असमर्थ ठरल्यास त्यांची बयाना रक्कम व बँक गॅरन्टी जप्त करण्यात येईल.
8. संयुक्त उपक्रम (Joint Venture) पात्र राहणार नाही.
9. निविदा धारकाने किमान शालेय राष्ट्रीय स्पर्धा / राज्यस्तरीय स्पर्धा / राष्ट्रीय स्पर्धा /आंतरराष्ट्रीय स्पर्धा /आयोजनाचा अनुभव पुरावा सादर करावा.

टिप :- सविस्तर टिप्पणी अटी व शर्तीवर नस्तीत उपलब्ध आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 296/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 01/03/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त (मालमत्ता), क्रीडा व सांस्कृतिक विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिकेचेनव्याने निर्माण केलेल्या प्रभाग क्र. 68, कर्वे नगर येथील "बॅडमिंटन हॉल" (क्रीडा संकुल) खाजगीसंस्थेला संचालन व देखभालीकरीता 5 वर्ष कालावधीसाठी देण्याकरीता EOI मागविण्याचा प्रश्न खालील अटी-शर्तीसह विचारात घेऊन,

1. निविदाधारकाने कमीत कमी एक प्रकल्प प्ले ग्राऊंड स्पोर्टस् कॉम्प्लेक्स, स्विमिंग पुल कॉम्प्लेक्स व तत्सम कामे सरकारी / निमसरकारी / स्थानिक संस्था /खाजगी महाविद्यालय मध्ये 3 वर्षे कार्य केल्याचे अनुभव कागदपत्र सादर करावे.
2. व्यक्ती / संस्थेने मागील 3 वर्षांचा आयकर परतावा भरल्याचा पुरावा सादर करावा. तसेच मागील 3 वर्षाची कमीत कमी उलाढाल 20 लक्ष असल्याचा मागील 5 वर्षांचा सनदी लेखापाल (C.A.) कडून प्रमाणित केलेला पुरावा सादर करावा.
3. 50 हजार रु. बयाना (EMD) रक्कमेचा भरणा ऑनलाईन पद्धतीने करण्यात यावा.
4. व्यक्ती / संस्था जर बयाना (EMD) रक्कम व संबंधी कागदपत्रे भरण्यास अपयशी ठरल्यास त्यांचा तांत्रिक लिफाफा उघडण्यात येणार नाही.
5. निविदा मान्य झालेल्या व्यक्ती / संस्थेला करारनामा करतांना 3 लक्ष रुपयांची डी. डी. सुरक्षा ठेव म्हणून सादर करणे आवश्यक आहे. तसेच म.न.पा. उपायुक्त (मालमत्ता) यांचे नांवे भरणा करण्यात येणा-या रक्कमेच्या 50% रक्कमेची राष्ट्रीयकृत बँकेची बँक गॅरन्टी करणे आवश्यक राहील.
6. व्यक्ती /संस्थेकडे कमीत कमी 2 प्रशिक्षक चालु वर्ष 2022 चे परवाना धारक (AIBF – All India Badminton Federation Or Maharashtra Badminton Association) प्रशिक्षक असणे आवश्यक आहे.
7. निविदा मान्य झालेली व्यक्ती / संस्था जर सुरक्षा ठेव रक्कम व बँक गॅरन्टी सादर करण्यात असमर्थ ठरल्यास त्यांची बयाना रक्कम व बँक गॅरन्टी जप्त करण्यात येईल.
8. संयुक्त उपक्रम (Joint Venture) पात्र राहणार नाही.
9. निविदा धारकाने किमान शालेय राष्ट्रीय स्पर्धा / राज्यस्तरीय स्पर्धा / राष्ट्रीय स्पर्धा /आंतरराष्ट्रीय स्पर्धा /आयोजनाचा अनुभव पुरावा सादर करावा.

उपरोक्त प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**